# सोलापूर महानगरपालिका,सोलापूर
## इंद्रभुवन, रेल्वे लाईन्स,सोलापूर-४१३००१

इमेल smccommissioner@yahoo.com
दुरध्वनी -०२१७-२७४०३००

जा.क्र.नआ/वै/ ११६२ दि.१४ जुलै २०२०

## आदेश

विषय: सोलापूर महानगरपालिका हद्दीत कोविड-१९ चा प्रार्दुभाव कमी करणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना

संदर्भ: १) भारतीय रोग साथ अधिनियम १८९७
२) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ६५ (१) (ब)
३) महाराष्ट्र शासन सार्व.आरोग्य विभागाकडील अधिसूचना क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५ दि.१४ मार्च २०२०

ज्याअर्थी जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणूमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणून घोषित केला आहे. तसेच कोरोना विषाणूचा प्रसार सोलापूर महानगरपालिका हद्दीत गतीने पसरत आहे असे दिसून येत आहे. तसेच राज्य शासनाने कोविड-१९ चा प्रार्दुभाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग अधिनियम १८९७ मधील खंड २, ३ व ४ च्या तरतुदी दिनांक १३/०३/२०२० च्या अधिसूचनेपासुन लागू करण्यात आलेली असून, त्या अंतर्गत नियमावली महाराष्ट्र कोविड उपाययोजना नियम २०२० तयार करुन दिनांक १४/०३/२०२० ला प्रसिध्द करण्यात आली या नियमावलीतील नियम १० नुसार कोविड-१९ चा प्रार्दुभाव कमी करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी महानगरपालिका आयुक्त, हे सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केलेले आहेत.

ज्याअर्थी महसुल व वन, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुर्नवसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे आदेश क्र.डीएमयु/२०२०/प्र.क्र./९२/डी आयएसएम-१ दिनांक २९/०५/२०२० नुसार निर्देश देण्यात आले आहेत की, स्थानिक परिस्थिती विचारत घेऊन महानगरपालिका आयुक्तांस, साथेरोगाच्या फैलावास परिरोध (प्रतिबंध) करण्यासाठी स्थानिक क्षेत्रामध्ये काही उपायोजनांची अंमलबजावणी करता येईल आणि परवानगी दिलेली बिगर अत्यावश्यक कार्ये व नागरिकांच्या संचार करण्यावर आवश्यक ते निर्बंध घालता येतील.

त्याअर्थी सोलापूर महानगरपालिका हद्दीचे कार्यक्षेत्रातील कोरोना विषाणूचा परिरोध (प्रतिबंध) करुन वाढती रुग्णसंख्या आटोक्यात आणण्यासाठी काही उपाययोजना करणे गरजेचे आहे. म्हणून विषाणूचा फैलाव होण्यास प्रतिबंध करण्यासाठी व परिरोध करण्यासाठी तातडीची उपाययोजना म्हणून साथरोग अधिनियम १८९७ याचे कलम २, ३ व ४ तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ व महाराष्ट्र कोविड उपाययोजना २०२० याच्या अन्य सर्व सहाय्यकारी तरतुदी अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन सोलापूर महानगरपालिका हद्दीत मी पि.शिवशंकर, आयुक्त सोलापूर महानगरपालिका आपल्या अधिकारात या आदेशाद्वारे सोलापूर शहराचे हद्दीत कोविड-१९ विषाणूचा परिरोध (प्रतिबंध) करण्यासाठी दिनांक १६/०७/२०२० चे रात्री २४.०० वाजता ते दिनांक २६/०७/२०२० रोजीचे २४.०० वाजेपर्यंत या १० दिवसाच्या कालावधीसाठी संपूर्ण टाळेबंदी जाहिर करीत आहे.

सदर आदेश लागू झाल्यापासून सोलापूर महानगरपालिका कार्यक्षेत्रात

**१) सोलापूर महानगरपालिका हद्दीतील संपूर्ण आस्थापना बंद राहतील.**

| | |
|---|---|
| १) | सर्व किराणा दुकान, सर्व किरकोळ व ठोक विक्रेते, सर्व इतर व्यावसाय करणारे व्यापारी दुकाने, सर्व प्रकारचे उद्योग संपूर्णतः बंद राहतील. |
| २) | सार्वजनिक/खाजगी क्रिडांगणे/मोकळ्या जागा या सर्व संपूर्णतः बंद राहतील. |
| ३) | उपहार गृह, लॉज, हॉटेल्स, डान्स ऑर्केस्ट्रा बार, रिसॉर्ट, मॉल, बाजार, मार्केट संपूर्णतः बंद राहतील. |
| ४) | सर्व केश कर्तनालय/सलुन/स्पॉ/ब्युटी पार्लर दुकाने संपूर्णतः बंद राहतील. |
| ५) | सर्व किरकोळ व ठोक विक्रीचे ठिकाणे मोंढा/आडत भाजी मार्केट/फळे विक्रेते/आठवडी व दैनिक बाजार, बाजार समिती सर्व ठिकाणी संपूर्णतः बंद राहतील. फ्लोअर मिल बंद राहतील. |
| ६) | शाळा, महाविद्यालये, शैक्षणिक संस्था, सर्व प्रकारचे शिकवणी संपूर्णतः बंद राहतील. |
| ७) | सार्वजनिक व खाजगी प्रवासी वाहने - दोन चाकी, तीन चाकी व चार चाकी, सहा चाकी संपूर्णतः बंद राहतील. |
| ८) | शहरातील सार्वजनिक व खाजगी बस सेवा संपूर्णतः बंद राहतील. |
| ९) | मटन, चिकन, अंडी व मासे विक्री संपुर्णतः बंद राहील. |
| १०) | ट्रक, टेम्पो, ट्रेलर, ट्रॅक्टर इत्यादी मालवाहतूक करणारी वाहने संपूर्णतः बंद राहतील. |
| ११) | सर्व प्रकारचे बांधकाम कन्स्ट्रक्शनची कामे संपूर्णतः बंद राहतील. |
| १२) | सर्व चित्रपटगृहे, व्यायामशाळा, जलतरण तलाव, करमणूक उद्याने, नाट्यगृह, बार, प्रेक्षागृह सभागृह संपूर्णतः बंद राहतील. |
| १३) | सर्व प्रकारचे मंगल कार्यालय, हॉल तसेच लग्न समारंभ, स्वागत समारंभ संपूर्णतः बंद राहतील. |
| १४) | सर्व प्रकारच्या खाजगी आस्थापना कार्यालये संपूर्णतः बंद राहतील. |
| १५) | सामाजिक/राजकीय/क्रिडा/मनोरंजन/सांस्कृतिक/धार्मिक कार्यक्रम व सभा संपूर्णतः बंद राहतील. |
| १६) | धार्मिक स्थळे/सार्वजनिक प्रार्थना स्थळे संपूर्णतः बंद राहतील. |
| १७) | सर्व मा.न्यायालये व राज्य शासनाचे / केंद्र शासनाचे कार्यालय तसेच अंगीकृत उपक्रम व स्थानिक संस्थेची कार्यालये बंद राहतील. |
| १८) | शासकीय स्वस्त धान्य दुकाने बंद राहतील. |
| १९) | कृषी/बी-बियाणे/खते/किटकनाशक ओषधे/सुका चारा दुकाने व त्यांची वाहतूक बंद राहील. |

२) **तथापि खालील अत्यावश्यक बाबी मर्यादीत स्वरुपात निर्बंधासह सुरु राहतील.**

| | |
|---|---|
| १) | दुध विक्रेते यांना घरपोच दुध वितरणासाठी सकाळी ०६.०० ते ०९.०० वाजेपर्यंत परवानगी राहील. दुध व दुग्धजन्य पदार्थ विक्री दुकाने बंद राहतील. शहराच्या बाहेरुन येणा-या दूध विक्रेत्यानी संबंधीत पोलीस ठाण्याकडून पासेस घेणे बंधनकारक राहिल. |
| २) | सर्व खाजगी व सार्वजनिक वैद्यकीय सेवा व पशुचिकित्सक सेवा त्यांचे नियमित वेळेनुसार सुरु राहतील. |
| ३) | सर्व रुग्णालये व रुग्णालयाशी निगडीत सेवा आस्थापना त्यांचे नियमित वेळेनुसार सुरु राहतील व कोणतेही लॉकडाऊनचा आधार घेऊन रुग्णांना आवश्यक सेवा नाकारणार नाही अन्यथा संबंधीत रुग्णसेवा संस्था कारवाईस पात्र राहील. |
| ४) | सर्व मेडिकल दुकाने २४ तास सुरु राहतील. तसेच ऑनलाईन औषधे सेवा सुरु राहील. औषधाशिवाय इतर विक्री अनुज्ञेय नाही. |
| ५) | एलपीजी गॅस सेवा घरपोहोच गॅस वितरण नियमानुसार सुरु राहील. |
| ६) | निर्यात होणाऱ्या वस्तुंची वाहतूक शासन नियमानुसार चालू राहील. |
| ७) | वर्तमानपत्र प्रिंटींग व वितरण, डिजीटल/प्रिंटमिडिया कार्यालय शासकीय नियमानुसार सुरु राहतील. वर्तमानपत्र वितरण सकाळी ०६.०० ते ०९.०० अनुज्ञेय राहील. |
| ८) | पाणीपुरवठा करणारे टँकरला नियमानुसार परवानगी राहील. |
| ९) | कोणत्याही व्यक्तीस अत्यावश्यक कारणाशिवाय घराबाहेर पडता येणार नाही. |
| १०) | संस्थात्मक अलगिकरण/विलगीकरण व कोविड केअर सेंटर करिता महानगरपालिकेने ताब्यात घेतलेल्या कार्यालयाच्या जागा, इमारती नियमानुसार सुरु राहतील. |
| ११) | लॉकडाऊन च्या काळामध्ये बँकेच्या सर्व शाखा बंद राहतील फक्त ए.टी.एम., एच.डी.एफ.सी बँक, एक्सीस बँक, जनता सहकारी बँक, व्ही.के.जी.बी. बँक व डी.सी.सी.बँक यांचे चेक क्लिअरिंग हाऊसेस यांच्या सेवा चालू राहतील. |
| १२) | संपूर्ण सोलापूर शहराचे हद्दीतील मा.न्यायालयाचे कर्मचारी, अधिकारी मा.न्यायाधिश, वकिल, शासकीय राज्य/केंद्र शासनाचे, व स्थानिक स्वराज्य संस्थांचे कर्मचारी, अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी, नियमित / कंत्राटी / मानधन -शासन अंगिकृत संस्थाचे कर्मचारी , आरोग्य सेवेतील कर्मचारी, डॉक्टर, नर्स, अंगणवाडीतील कर्मचारी, आशा वर्कर, वर्तमानपत्र, प्रिंटीग व डिजीटल मिडीयाचे कर्मचारी, फार्मा व औषधी संबंधीत मेडिकल शॉपचे कर्मचारी, दुध विक्रेते अत्यावश्यक सेवा जसे की, BSNL व मोबाईल टॉवर सेवा, अग्निशामक सेवा, जलनित्सारण सेवा, गॅस वितरक, पाणी पुरवठा, सो.म.पा. परिवहन व्यवस्था, ॲब्युलन्स सेवा व स्वच्छता महानगरपालिकेचे कर्मचारी, पोलिस विभागाचे कर्मचारी, महसूल विभागाचे कर्मचारी तसेच कंटेनमेन्ट झोन करिता नियुक्त कर्मचारी पेड हॉटेल क्वारंटाईनचे कर्मचारी व पत्रकार यांनाच चारचाकी, दुचाकी (स्वत:करिता फक्त) वाहन वापरण्यास परवानगी राहील. या सर्व कर्मचारी/अधिकारी यांनी स्वत:चे कार्यालयाचे ओळखपत्र तसेच शासकीय कर्मचारी सोडून इतरांनी स्वत:चे आधारकार्ड सोबत टेवावे व वाहनाचे आवश्यक परवाने सोबत ठेवावे. या सर्वांना वाहन फक्त शासकीय कामासाठी अथवा त्यांचे कामाचे जबाबदारी नूसार व शासकीय अथवा त्यांच्या संस्थेने दिलेल्या वेळेतच वापरता येईल. |
| १३) | शहरातील पोलिस विभागामार्फत संचलित केले जाणारे दोन पेट्रोल पंप २४ तास चालू राहतील. |

| | |
|---|---|
| १४) | कंटेनमेंन्ट झोन मध्ये काम करणारे मुख्य समन्वयक, सह समन्वयक, नोडल अधिकारी, गस्ती पथकातील कर्मचारी, त्यांचे कंटेनमेंन्ट झोन मध्ये निर्यामित कार्य करतील, कंटेनमेंन्ट झोन मधील नागरिकांना काही अत्यावश्यक गरजा मागणी असल्यास त्याची पुर्तता करतील. |
| १५) | औषध व अन्न उत्पादन, सलग्न प्रक्रिया आणि निर्यात उद्योग व त्यांचे पुरवठादार नियमानुसार चालु राहतील व यासाठी एम.आय.डी.सी. पोर्टल वरुन यापूर्वी देण्यात आलेल्या परवानग्या ग्राह्य धरण्यात येतील. |
| १६) | सोलापूर शहरातून परवाना असलेल्या उद्योगांना उद्योग क्षेत्रामध्ये जाण्यासाठी आणि परतीसाठी फक्त कार (चार चाकी वाहन) किंवा निश्चित केलेल्या बस मधूनच प्रवास करायला परवागनी राहील. |
| १७) | एम.आय.डी.सी.तील किंवा खाजगी उद्योग चालू राहणार असल्यामुळे त्यांना आवश्यक तो पास संबंधीत पोलिस ठाणेकडून घेऊन कामगारांची वाहतूक निश्चित बसने करता येईल. |
| १८) | जे उद्योग कामगाराची १० दिवस फॅक्टरीमध्ये, इमारत बांधकाम, मंजूर विकास कामांची यंत्रणा, स्थानिक निवास व्यवस्था करणार, त्यांची कामे नियमानुसार चालू ठेवण्यास कोणतीही अडचण नाही. |
| १९) | फुड डिलिव्हरी/होम डिलिव्हरी सेवा चालू राहतील. तथापी यासाठी पोलीस पासेस आवश्यक आहेत. तसेच यासाठी आवश्यक कामगारांची कामाच्या ठिकाणी राहण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे. |
| २०) | शहराबाहेर राहत असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे कामाच्या ठिकाणीच राहणे बंधनकारक राहील. |
| २१) | यापूर्वी नोंदणी करुन बुकिंग केल्यानुसारच लॉजेस चालू राहतील. नविन बुकिंगला परवानगी राहणार नाही. |
| २२) | ई-कॉमर्स ऑनलाईन बुकिंग डिलिव्हरी सेवा चालू राहील. |
| २३) | बी.एस.एन.एल. व इतर मोबाईल कंपन्या टॉवर देखभाल मर्यादित कर्मचारी वर्गासह सुरु राहिल. |
| २४) | शहराबाहेर ज्यांची शेती आहे त्यांनी सकाळी ९.०० पर्यंत जाणे व सायंकाळी ५.०० पर्यंत परत येणे यासाठी परवानगी देण्यात येत आहे तथापी राहत असलेल्या ठिकाणच्या पोलीस ठाणे कडून पासेस बंधनकारक असतील. |
| २५) | पशुधन ओला चारा (गवत ईत्यादी) यासाठी संबंधित पोलीस स्टेशनचे पासेस आवश्यक असतील. |
| २६) | सार्वजनिक व खाजगी प्रवासी वाहने- २ चाकी, ३ चाकी व ४ चाकी संपुर्णतः बंद राहतील. तथापि आवश्यक सेवेतील वाहने पुर्वपरवानगी प्राप्त वाहने तसेच विमानतळ, रेल्वेस्टेशन येथे जाणे-येणे करिता व वैद्यकीय कारणास्तव प्रवासासाठी खाजगी वाहनाचा वापर अनुज्ञेय राहील. |
| २७) | अत्यावश्यक सेवा व वस्तु यांचा पुरवठा करणारी घाऊन वाहतूक सदरच्या आदेशातून वगळण्यात येत आहे. |
| २८) | सर्व प्रकारचे मंगल कार्यालये, हॉल तसेच लग्न समारंभ, स्वागत समारंभ संपुर्णतः बंद राहतील. |
| २९) | औद्योगिक पुरवठा साखळी अबाधित ठेवण्यासाठी आवश्यक अशी स्थानिक अंतरजिल्हा, अंतरराज्य वाहतूक शासकीय नियमानुसार सुरु राहील. |

| | |
|---|---|
| ३०) | दैनिक वर्तमानपत्रे, नियतकालिके यांची छपाई व वितरण व्यवस्था तसेच डिजीटल/प्रिंट मिडिया यांची कार्यालये शासकीय नियमानुसार सुरु राहतील. वर्तमानपत्राचे वितरण सकाळी ६ ते ९ या वेळेमध्ये अनुज्ञेय राहील. |
| ३१) | सोलापूर शहरातून परवाना असलेल्या उद्योगांना उद्योग क्षेत्रात जाणेसाठी व परतीसाठी परवानगी राहील. मात्र कर्मचाऱ्यांनी त्यांची ओळखपत्रे सोबत ठेवणे बंधनकारक राहील. प्रतिबंधीत क्षेत्राबाहेरील व्यक्तीसच फक्त कामावर उपस्थित राहता येईल. |

या शिवाय इतर कोणतीही व्यक्ती पायी अथवा सायकलवर अथवा चारचाकी अथवा दोनचाकी वाहन घेऊन घराबाहेर फिरणार नाही असे इतर कोणतीही व्यक्ती वाहन घेऊन विनाकारण फिरत असल्यास त्यांचे चारचाकी/दुचाकी वाहन जप्त करण्यात येईल. त्यांचा वाहन परवाना रद्द करण्यात येईल व त्यांच्यावर साथरोग नियंत्रण कायद्यातील तरतुदीनुसार व तत्सम इतर कायद्यातील तरतुदी नुसार गुन्हा नोंद करण्यात येईल.

या लॉकडाऊनच्या कालावधीत पोलिस ठाणे प्रमुख यांनी ०५ ऑटो रिक्षा पोलिस ठाणे येथे उभी राहतील याची दक्षता घ्यावी व यांचा वापर त्यांच्या कार्यक्षेत्रात कोणी आजारी असल्यास, कोणाला तातडीने दवाखान्यात जायचे असल्यास या अत्यावश्यक कामासाठी करावा, तसेच ही सेवा उपलब्ध असुन संबंधीत गरजु रुग्णांनी संपर्क साधणे बाबत पोलिस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात पुरेशी प्रसिध्दी मेगाफोन द्वारे करावी.

लॉकडाऊन अत्यंत कडकपणे अंमलबजावणी करणे करिता पोलिस विभागास सहाय्य करणेसाठी ४०० लॉकडाऊन सहाय्यक (Assistant) २६ लॉकडाऊन पर्यवेक्षक (Supervisor) २६ क्षेत्र अधिकारी (Sector Officer) २६ लॉकडाऊन निरीक्षक (Observer) यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

लॉकडाऊन सहाय्यक (Assistant) हे पोलिस कॉन्स्टेबल समवेत प्रत्यक्ष लॉकडाऊनची कडक अंमलबजावणी करीता सहकार्य करतील.

लॉकडाऊन पर्यवेक्षक (Supervisor) हे पोलिस ठाणे प्रमुख यांचेशी समन्वय ठेवून लॉकडाऊनची कडक अंमलबजावणी बाबत लॉकडाऊन सहाय्यक यांचे पर्यवेक्षण करतील.

क्षेत्र अधिकारी (Sector Officer) हे त्यांचे नियुक्त सेक्टर मध्ये लॉकडाऊनची कडक अंमलबजावणी बाबत सतत दौरा करुन पाहणी करतील.

२६ लॉकडाऊन निरीक्षक (Observer) हे शहरातील विविध भागात फिरुन लॉकडाऊनची कडकपणे अंमलबजावणी होत आहे याबाबत पाहणी करतील.

उपरोक्त आदेशाचे पालन न करणाऱ्या विरुध्द कोणतीही व्यक्ती, संस्था, भारतीय दंड संहितेच्या कलम १८८ अन्वये कायदेशिर कारवाई करण्याशिवाय, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ याची कलमे ५१ ते ६० च्या तरतुदीनुसार कार्यवाही करण्यास पात्र असतील.

वरील आदेशाची अंमलबजावणी करीत असताना कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आवश्यक ते कृत्य व सद्हेतूने केलेल्या कोणत्याही कृत्यासाठी कुठल्याही अधिकारी व कर्मचारी यांचे विरुध्द कुठल्याही प्रकारची कायदेशिर कार्यवाही अथवा खटला दाखल करता येणार नाही. (आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ७३)

उपरोक्त नमुद ठिकाणे, संबंधीत व्यक्ती, आस्थापना, मालक/चालक,आयोजक/व्यवस्थापक/कार्यालये इत्यादी यांना प्रत्येकास स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७ मधील प्राप्त अधिकाराचा वापर करुन सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहिती प्रसार

माध्यमे, सर्व महानगरपालिकेचे कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय सोलापूर, सर्व पोलिस ठाणे यांचे नोटीस बोर्डवर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

सोलापूर महानगरपालिकेकडून कोरोना बांधितांची व शहरातील कोविड-१९ हॉस्पिटलच्या माहितीसाठी संपर्क करणेकरिता कोविड कंट्रोल रुम सोलापूर महानगरपालिका या विभागाकडील मोबाईल क्र.९८२३२९१८१८ व फोन क्रमांक ०२१७-२७४०३४१ या नंबरवर तसेच ccsmc२०२०@gmail.com या ई-मेलद्वारे संपर्क करावे.

केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी दिलेले कोविड-१९ च्या व्यवस्थापना बाबतचे राष्ट्रीय निर्देशाचे पालन करण्यात येईल (जोडपत्र-१ व २)

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी आज दिनांक १४/०७/२०२० रोजी दिलेला आहे.

स्थळ :- सोलापूर
दिनांक १४/०७/२०२०

SOLAPUR MUNICIPAL COMMISSIONER OFFICE

(पि.शिवशंकर भा.प्र.से.)
आयुक्त
सोलापूर महानगरपालिका.

प्रत: माहितीस्तव सादर

१) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मा.विभागीय आयुक्त, पुणे.
३) मा.जिल्हाधिकारी, सोलापूर.
४) मा.पोलिस आयुक्त, सोलापूर.
५) जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर

प्रत कार्यवाहिस्तव:

१) सर्व विभाग प्रमुख, सोलापूर महानगरपालिका
२) सर्व विभागीय अधिकारी (झोन क्र.१ ते ८) सोलापूर महानगरपालिका
३) जनसंपर्क अधिकारी यांनी आदेशास योग्य ती प्रसिध्दी द्यावी.

## जोडपत्र-१

## कोविड-१९ च्या व्यवस्थापनाबाबतचे राष्ट्रीय निर्देश

१) **चेहरा झाकणे** - सार्वजनिक ठिकाणी, कामाच्या ठिकाणी व प्रवास करताना, चेहरा झाकणे अनिवार्य आहे.

२) **सामाजिक अंतर राखणे** - सार्वजनिक ठिकाणी, सर्व व्यक्तींना कमीत कमी ६ फुट (२ गज की दूरी) इतके अंतर राखले पाहिजे. दुकानदार, ग्राहकांमध्ये शारीरिक अंतर राखण्याची सुनिश्चिती करतील आणि एकावेळी पाचपेक्षा अधिक व्यक्तींना मुभा देणार नाहीत.

३) **एकत्र जमणे** - मोठी सार्वजनिक संमेनले/भव्य सभा यांस नियमितपणे मनाई असेल. अंत्यसंस्कार/अंत्यविधी यासंबंधातील कार्यक्रमात एकत्र जमणे-व्यक्तींची संख्या २० पेक्षा अधिक असणार नाही.

४) **सार्वजनिक ठिकाणी थुंकणे** - हे, संबंधीत स्थानिक प्राधिकरणांद्वारे, त्यांचे कायदे, नियम, विनियम यानुसार विहित करण्यात येईल अशा दंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

५) सार्वजनिक ठिकाणी मद्यपान, पान, तंबाखु, ईत्यादींच्या सेवनास मनाई आहे.

## कामांच्या ठिकाणांबाबतचे अतिरिक्त आदेश

६) **घरातून काम करणे** - शक्य असेल तेथवर, घरुन काम करण्याची पध्दत अनुसरण्यात यावी. कार्यालये, कामाची ठिकाणे, दुकाने, बाजारपेठा आणि औद्योगिक व वाणिज्यिक आस्थापना यामध्ये कामाच्या / कामकाजाच्या वेळांची सुनियोजितपणे आखणी करावी.

७) **परिक्षण (स्क्रिनिंग) व स्वास्थ** - औष्णिक परीक्षण (थर्मल स्क्रिनिंग) हात स्वच्छ करण्योच द्रव्य (हॅण्डवॉश) व निर्जुतुकीकरण द्रव्य (सॅनिटायझर) हे सर्व प्रवेशद्वाराजवळ व निर्गमन द्वाराजवळ आणि सामाईक क्षेत्रात पुरविण्यात येईल.

८) **वारंवार निर्जुंतुकीकरण (सॅनिटायझेशन)** - संपूर्ण कामाच्या ठिकाणाचे, सामाईक सुविधांचे व मानवी संपर्कात येणाऱ्या सर्व जागा यांचे, उदाहरणार्थ दरवाजांच्या मुठी (डोअर हॅन्डल) ईत्यांदीचे कामाच्या पाळ्यामध्ये वारंवार निर्जुंतुकीकरण (सॅनिटायझेशन) करण्याची सुनिश्चिती करण्यात येईल.

९) **सामाजिक अंतर राखणे** - कामाच्या ठिकाणांच्या सर्व प्रभारी व्यक्ती, कामगारांमध्ये पुरेसे अंतर राखणे, कामाच्या पाळयांदरम्यान पर्याप्त अंतर ठेवणे, दुपारच्या जेवणाच्या वेळेत पुरेसे अंतर राखणे, ईत्यादीद्वारे सामाजिक अंतर राखण्याची सुनिश्चिती करतील.

**जोडपत्र-२**

**पेड क्वारंटाईनचे हॉटेल / लॉज यांची यादी**

१) हॉटेल सुर्या, मुरारजी पेठ, सोलापूर.
२) हॉटेल लोटस, गांधी नगर सोलापूर.
३) हॉटेल राधेकृष्ण, मुरारजी पेठ, सोलापूर.
४) हॉटेल निला, सम्राट चौक, सोलापूर.
५) मनोज लॉज, शिवाजी चौक, सोलापूर.
६) हॉटेल ऐश्वर्या, मुरारजी पेठ, सोलापूर.
७) हॉटेल वैष्णवी, मुरारजी पेठ, सोलापूर.
८) हॉटेल आर्शिवाद, होटगी रोड, सोलापूर.
९) हॉटेल श्रीकृष्ण, मुरारजी पेठ, सोलापूर.
१०) साईप्रसाद लॉज, रामलाल चौक, सोलापूर.